आनंदाचा अनुकार

(ज्ञानेश्वरीतील उपमादृश्ये)



आसावरी काकडे

आनंदाचा अनुकार

ज्ञानेश्वरीतील उपमांना छायाचित्रांच्या माध्यमातून दृश्यस्वरूप देण्याचा अल्पसा प्रयत्न...

आसावरी काकडे

आनंदाचा अनुकार

छायाचित्रे, काव्य, ओव्यांचे निरूपण: आसावरी काकडे

‘सेतू’ डी १/३, स्टेटबँकनगर, कर्वेनगर, पुणे, ४११०५२ .

फोन नं. ९४२१६७८४८० / ९७६२२०९०२८

Email- asavarikakade@gmail.com

Blog- asavarikakade.blogspot.com

या पुस्तकातील लेखन व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १९ ऑक्टोबर २०२१ अश्विन शुद्ध पौर्णिमा शके १९४३

(कोजागिरी पौर्णिमा)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

आसावरी श्रीनिवास काकडे

बी.कॉम., एम.ए. मराठी, एम.ए. तत्त्वज्ञान

प्रकाशित पुस्तके-

गद्यलेखन-

*'कवितेभोवतीचं अवकाश' (लेखसंग्रह)

*ईशावास्यम् इदं सर्वम्: एक आकलन-प्रवास' (तत्त्वज्ञान)

* 'अथांग'- (अनुवादित कादंबरी) बिन्द्या सुब्बा यांच्या 'अथाह' या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.

* आनंदी गोपाळ (कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती) श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे मुलांसाठी संक्षिप्तीकरण

कवितासंग्रह-

मराठी- ९ : 'आरसा', 'आकाश', 'लाहो', 'मी एक दर्शनबिंदू', 'रहाटाला पुन्हा गती दिलीय मी', 'स्त्री असण्याचा अर्थ', 'उत्तरार्ध', 'व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर' आणि 'भेटे नवी राई'

हिन्दी- ३ : 'मौन क्षणों का अनुवाद', 'इसीलिए शायद', आणि 'मेरे हिस्से की यात्रा'- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिन्दी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिळ अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

अनुवादित- ४

* ‘बोल माधवी’ (चन्द्रप्रकाश देवल यांच्या ‘बोलो माधवी’ या हिन्दी कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तरीही काही बाकी राहील’ (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिन्दी कवितांचा अनुवाद),

* ‘लम्हा लम्हा’ (दीप्ति नवल यांच्या ‘लम्हा लम्हा’ या कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तू लिही कविता’ (डॉ. दामोदर खडसे यांच्या ‘तुम लिखो कविता’ या कवितासंग्रहाचा अनुवाद)

बालगीतसंग्रह-५: ‘टिक टॉक ट्रिंग’, ‘अनु मनु शिरू’, ‘जंगल जंगल जंगलात काय?’(इसापगाणी), ‘भिंगोऱ्या भिंग’, ‘ऋतुचक्र’

ब्लॉग्ज- ‘ब्लॉग, एक नवी सुरुवात’ या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित.

(http://www.asavarikakade.blogspot.com)

काही महत्त्वाचे पुरस्कार-

* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६

* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार

* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार

* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार

* बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार
* 'कवितेभोवतीचं अवकाश'- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार
* 'ईशावास्यम् इदं सर्वम्...'- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.
* एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति 'मृण्मयी' पुरस्कार,
* पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार

इतर सन्मान

* इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.
* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व
* हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा 'सम्मेलन सम्मान'- २००४
* अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.

अनुक्रम

१ विवेकतरू
२ अमूर्ताचा कडवसा
३ पूर्वेच्या राउळी
४ तरंग होऊन
५ अनुपम्य सृष्टी
६ आडकंठ
७ जिवाच्या भीतीने
८ असंख्यात पाने
९ आकाशी जमती
१० सूर्योदयाआधी
११ आदिशून्यांचा गाभारा
१२ पाण्याचा आवेग
१३ जळी खेळे चंद्र
१४ पाणी जरी गूढ
१५ दिव्यावर दिवा
१६ विश्वपसारा
१७ विस्तार वडाचा
१८ गंध जाई दूर
१९ कमळ फुलता
२० वर खाली आत
२१ अमृताचा घनु
२२ दु:खकालिंदी
२३ विश्वरूप तुझे
२४ घरट्यात जीव
२५ माळी नेतो तसे
२६ आभासी नीलिमा
२७ मुळांना खालती
२८ गाभ्यात पोकळ
२९ नभ मेघांतळी
३० गळणे फुलणे..
३१ आरशात बिंब
३२ घट फुटे तेव्हा..
३३ अनेकधा झाले..
३४ ऐल ओलांडुनी
३५ अवस्थात्रयाने...
३६ मेघ उपसती..
३७ निषिद्ध कर्माचे..
३८ सूर्यरश्मी जशा..
३९ शाखा असे खूण..
४० देह अहंतेचे..
४१ निराकार जरी..
४२ आकाश वर्षते..
४३ वारा जाई दूर..
४४ गर्जनेशिवाय..
४५ सात्विक ते धैर्य..
४६ मुक्काम दिसता

मनोगत

ज्ञानेश्वरीतील उपमा दृश्यरूपात मांडण्याची कल्पना सुचली ती एका स्वांतःसुखाय चालू असलेल्या छंदातून.. आधुनिक मोबाईलच्या अनेक सुविधांमधली छायाचित्र काढता येणं ही सुविधा मला सर्वात अधिक मोहवून टाकणारी वाटलीय. बाहेर पडलं की लगेच माझी नजर भिरभिरू लागते. काही वेगळं, सुंदर दिसलं की ते आधी नजर टिपते मग मोबाईलमधला कॅमेरा.. स्वतःला आनंद देणारे असे फोटो एकाच वेळी अनेकांशी शेअर करणंही आता अगदी सहज होऊ शकतं. एकदा एका फोटोखाली अभंग छंदात दोन ओळी लिहिल्या गेल्या. खूप छान वाटलं. मग फोटो आणि दोन ओळी शेअर करणं हा रोजचा कार्यक्रमच झाला. प्रतिसादही चांगला मिळाला... अभिव्यक्तीची एक नवी शैलीच सापडल्यासारखं झालं..!

एकदा एका फोटोवर दोन ओळी लिहिताना त्यात ज्ञानेश्वरीतली, मनात रेंगाळलेली 'आनंदाचा अनुकार' ही उपमा वापरली गेली. खरंतर तो फोटो काढताना ती उपमाच दृश्य रूपात समोर साकारलीय असं जाणवलं... सकाळचं प्रसन्न निळं आकाश. दाट झाडी असलेलं क्षितिज आणि त्या दोन्हीचं जलाशयात पडलेलं प्रतिबिंब.. नजर न हलवता टिपलं ते दृश्य.. आणि त्या खाली लिहीलं- 'अनुपम्य सृष्टी

खेळ निर्मात्याचा / जणू आनंदाचा अनुकार..!' यात फक्त ओवीतली उपमा आहे. हा ओवीचा अनुवाद नाही...

मनात आलं, ज्ञानेश्वरीतल्या उपमांना छायाचित्रांच्या माध्यमातून असं दृश्य रूप देता आलं तर? त्या उपमा, त्यांचा संदर्भ आणि तत्त्वविचार सर्वच समजून घ्यायला मदत होईल. मग मला विशेष भावलेल्या उपमा जाणीवपूर्वक दृश्य रूपात मांडण्याचा प्रयत्न सुरू केला. उपमेला साजेसा फोटो, माझ्या दोन ओळी आणि खाली ज्ञानेश्वरीतली ती उपमा असलेली ओवी, तिचा अर्थ आणि संदर्भ लिहिणं असा उपक्रम सुरू झाला... २०१५ साली मी त्याचा 'ज्ञानेश्वरीतील उपमा' हा ब्लॉग तयार केला होता. त्याच ब्लॉगचे आता ईपुस्तक करत आहे. त्यासाठी ब्लॉगची वर्ड फाईल करण्याचे अवघड काम माझा भाऊ दिलीप आपटे यानं तत्परतेनं आणि मला हवं तसं करून दिलं. त्यात शीर्षकासह काही कलात्मक बदल करून ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे 'आनंदाचा अनुकार' या नावानं ई पुस्तकरूपात आता ते प्रकाशित होत आहे. या ईपुस्तक निर्मितीमधील या दोघांच्या हार्दिक सहभागाबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते..

आसावरी काकडे

अनुपम्य सृष्टी खेळ निर्मात्याचा

जणू आनंदाचा अनुकार..!



विवेकतरूचे । अनोखे उद्यान
करावे जतन । ज्याचे त्याने..!

१ विवेकतरू

“ आतां अवधारा कथा गहन । जे सकळा कौतुकां जन्मस्थान ।
कीं अभिनव उद्यान । विवेकतरूंचे ॥ २८/१ ”

कथा म्हणजे महाभारत कथा. ती गहन आहे, सगळ्या चमत्कारांचे जन्मस्थान आहे.. आणि ती ‘विवेकतरू’चे उद्यान आहे.

या कथेत असंख्य उपकथा आहेत. त्यांचं प्रयोजन जाणून घेण्यासाठी विवेकाची आवश्यकता आहे. विवेकतरूंचे उद्यान ही उपमा म्हणजे केवळ प्रासादिकता नाही. तर समजून घेण्याचा तो एक दृष्टीकोन आहे.

***

विश्व अमूर्ताचा । असे कडवसा
चैतन्य-विलासा । पार नाही..!

२ अमूर्ताचा कडवसा

देखें विश्वभ्रमाऐसा । जो अमूर्ताचा कडवसा ।
तो जयाचिया प्रकाशा । पुरेचिना ॥ (१७४/४)

ज्ञानाचं महत्त्व सांगत असताना दिलेली उपमा-

(कडवसा म्हणजे पडछाया.)

विश्व म्हणजे निराकाराची केवळ सावली आहे हे ज्ञानी माणसाला सहज उमगतं.. त्याच्या ज्ञानाच्या प्रकाशापुढं हा पसारा काहीच नाही..!

***

पूर्वेच्या राउळी । सूर्याची दिवाळी
फिटली काजळी । अवघीच..!

३ पूर्वेच्या राउळी

“ जैशी पूर्वदिशेचां राउळीं । उदयाची सूर्ये दिवाळी ।
कीं येरींहि दिशा तियेचि काळीं । काळिमा नाही ॥ (८६/५)”

अज्ञान नाहीसे होऊन संभ्रम दूर झाल्यावर द्वैतभाव उरत नाही. एकत्वाची लख्ख प्रचिती येते हे सांगत असताना दिलेली उपमा-

पूर्व दिशेच्या राउळात सूर्योदयाची दिवाळी झाली की सर्वच दिशातील काळोख नाहीसा होतो.

***

तरंग होऊन । स्वतःशीच खेळे
जळी जळ लोळे । स्वानंदात..!

४ तरंग होऊन

“ हे असो पवनाचेनि मेळें। जैसे जळींचि जळ लोळे ।
ते आणिकें म्हणती वेगळे । कल्लोळ हे ॥१००/५ ”

जसे वाऱ्यामुळं तरंग निर्माण होतात. ते तरंग म्हणजे मुळात पाणीच असतं पण पाहणाऱ्याला पाणी आणि तरंग वेगळे वाटतात. तसे विश्वाचे मूळ स्वरूप एक आहे. अज्ञानामुळे सर्वत्र वेगळेपण जाणवते हे समजावून सांगताना ही उपमा दिलेली आहे.

***

अनुपम्य सृष्टी | खेळ निर्मात्याचा
जणू आनंदाचा | अनुकार..!

५ अनुपम्य सृष्टी

“ते आनंदाचे अनुकार । सुखाचे अंकुर ।
की महाबोधे विहार । केले जैसे ॥ (१३८/५)”

ऐक्याचे ज्ञान प्राप्त झालेल्या व्यक्तींचे वर्णन करताना दिलेली उपमा-

(अनुकार- प्रतिबिंब, आकाराचा अनुवाद)

अव्दैत-ज्ञानाची प्रचिती आलेली माणसं त्या ज्ञानसुखानं ओतप्रोत भारलेली असतात. ती जणू आनंदाचे अनुकार असतात. सुखाचे कोंभ असतात. अव्दैताच्या महाबोधानं त्यांना राहायला मंदिर दिलेलं असतं..!

***

मनुष्य-जन्माचे । सार्थक कराया
कर्माच्या पायऱ्या । चुकू नये..!

६ आडकंठ

“ आतां योगाचळाचा निमथा । जरी ठाकावा आथि पार्था ।
तरी सोपाना या कर्मपथा । चुका झणी ॥
येणे यमनियमांचेनि तळवटे । रिगे आसनाचिये पाउलवाटे ।
येई प्राणायामाचेनि आडकंठे । वरौता गा ॥’ ५४,५५/६”

कर्म आणि योगमार्गाचा परस्परपूरक संबंध सांगताना दिलेली उपमा-

योगाच्या पर्वतावर जायचे तर कर्ममार्गाच्या पायऱ्यांनी जावे. यमनियमांच्या पायथ्यापासून आसनांच्या पाउलवाटेने प्राणायामाचा अवघड कडा पार करून वर जावे.

***

जिवाच्या भीतीने | असा अडकला
पंख विसरला | अज्ञानात..!

७ जिवाच्या भीतीने

“ जैसी ते शुकाचेनि आंगभारे । नळिका भोविन्नली एरी मोहरे ।
तरी तेणे उडावे परि न पुरे । मनशंका ॥ ७६/६ ”

ज्ञान प्राप्त करून घेण्याची क्षमता असूनही देहभावात लडबडलेला माणूस, उडता येण्यासाठी पंख आहेत हे विसरून आपण पडू या शंकेनं नळीला लोंबकळत राहणाऱ्या पोपटासारखा देहात अडकून राहतो.

***

असंख्यात पाने । एकलेच रोप
अव्दैतात झोप । ज्ञानियाला..!

८ असंख्यात पाने

‘ना तरी वृक्षाची पाने जेतुली । तेतुली रोपे नाही लावली ।
ऐसी अव्दैत दिवसे पाहली । रात्री जया ॥

तो पंचात्मकी सापडे । मग सांग पा कैसेनि अडे ।
जो प्रतीतीचेनि पाडे । मजसी तुके ॥ ४००, ४०१/६

वृक्षाला जेवढी पानं असतात तेवढी रोपं लावलेली नसतात.. असं अव्दैताचं ज्ञान झालं, त्याची खूणगाठ पटलीय अशा अव्दैत दिवसानं व्दैताची रात्र अनुभवली तरी तो व्दैतभावात अडकून राहात नाही.. ‘ज्ञानी’ माणूस पंचमहाभूतात्मक शरीरात असला तरी तो देहभावात अडकून पडत नाही हे समजावताना ही उपमा दिलेली आहे.

***

आकाशी जमती | विरळसे ढग
धरेनात तग | वर्षेनात..!

९ आकाशी जमती

“ जैसे अकाळी आभाळ । अळुमाळु सपातळ ।
विपाये आले केवळ । वसे ना वर्षे ॥’ ४३४/६”

थोडे विरळ ढग अकाळी चुकून गोळा झाले तरी ते टिकत नाहीत आणि बरसतही नाहीत.

श्रद्धाळू व्यक्ती प्रयत्नपूर्वक योगसाधना न करताच मोक्षाच्या मार्गाला जाऊ लागते.. त्याला मोक्ष तर मिळत नाही पण श्रद्धा असल्यामुळे आत्मप्राप्तीची आशाही सोडवत नाही. अशा मधल्या अवस्थेचे वर्णन करण्यासाठी ही उपमा दिलेली आहे. अशा माणसाला कोणती गती प्राप्त होते असा प्रश्न पुढे अर्जून विचारतो.

***

सूर्योदया आधी । क्षितिज प्रकाशे
अल्पवयी तसे । निजज्ञान..!

१० सूर्योदयाआधी

“ मोटकी देहाकृती उमटे । आणि निजज्ञानाची पहाट फुटे ।
सूर्यापुढां प्रगटे । प्रकाशु जैसा ॥
तैशी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येता ।
बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ॥ ४५२,४५३/६ ”

मोक्षमार्गातील माणसाला आत्मप्राप्ती होण्याआधीच मृत्यु आला तर त्याला योग्यांच्या कुळात जन्म मिळतो व अल्प वयातच त्याच्या ठिकाणी स्वरूपज्ञानाचा उदय होतो. हे समजावताना दिलेली उपमा- सूर्योदयापूर्वी तो येत असल्याची ग्वाही देत प्रकाश येतो तसा मनुष्यजन्म प्राप्त होऊन प्रौढत्व येण्याआधीच त्यास स्वरूपज्ञान प्राप्त होते.

***

आदिशून्यांचा की । भरला गाभारा
प्रकृती-पसारा । अनावर..!

११ आदिशून्यांचा गाभारा

“होती चौऱ्यांशी लक्ष थरा । येरा मिति नेणिजे भांडारा ।
भरे आदिशून्यांचा गाभारा । नाणेयांसी ॥ (२४/७)”

शून्यातून सृष्टी कशी निर्माण झाली हे समजावताना दिलेली उपमा-

पंचमहाभूते आणि मन बुद्धी अहंकार ही अष्टधा प्रकृती. सूक्ष्म प्रकृतीशी जेव्हा या स्थूल प्रकृतीचा मेळ होतो तेव्हा जीवसृष्टीची टांकसाळ सुरू होते... ८४ लक्ष योनींचे आकार आणि इतर आणखी अगणित आकार यांनी ‘आदिशून्याचा गाभारा’ भरून जातो...

***

पाण्याचा आवेग । वीज निर्मितसे
पण पाणी नसे । विजेमधे..!

१२ पाण्याचा आवेग

“ ‘पै गगनी उपजे आभाळ । परि तेथ गगन नाहीं केवळ ।
अथवा आभाळीं होय सलिल । तेथ अभ्र नाही ॥
‘मग तया उदकाचेनि आवेशे । प्रगटले तेज जे लखलखीत दिसे ।
तिये विजूमाजी असे । सलिल कायी ॥ ५७, ५८/७”

ढगांमधे पाणी असतं पण त्या पाण्यात ढग नसतात... पाण्याच्या ‘आवेशा’मुळे वीज निर्माण होते पण त्या विजेत पाणी असत नाही.. त्याप्रमाणे हे सर्व विश्व जरी माझ्यामुळे निर्माण झाले तरी त्या कशात मी असत नाही. हे समजावताना वरील उपमा दिलेल्या आहेत-

***

जळी खेळे चंद्र । असून नभात
तसाच देहात । खेळे भक्त..!

१३ जळी खेळे चंद्र

“ ‘येरी शरीराचिया सलिलीं । असतेपण हेचि साउली ।
वाचूनि चंद्रिका ते ठेली । चंद्रीच आहे ॥’ १३८/८

‘जे जाळ जळी पांगिले । तेथ चंद्रबिंब दिसे आंतुडले ।
परी थडिये काढूनि झाडिले । तेव्हा बिंब के सांगे ॥’ १३८/९”

खऱ्या भक्ताचे स्वरूप सांगताना दिलेली उपमा-

पाण्यात चंद्र दिसला तरी खरा चंद्र आकाशात असतो त्याप्रमाणे खरा भक्त शरीररूपात दिसत असला तरी तो माझ्याशी एकरूप झालेला असतो.

पाण्यात जाळं टाकलं तर पाण्यातलं चंद्राचं प्रतिबिंब जाळ्यात अडकल्यासारखं दिसतं. पण काठावर आणून जाळं झटकलं तर चंद्र खाली पडेल का? अडकलेय असं वाटणं हे अज्ञान. ज्ञान झाले की सत्य समजते हे सांगताना ही उपमा दिलेली आहे.

***

पाणी जरी गूढ । सज्ज आहे नाव
‘पल्याड’चे गाव । गाठावया..!

१४ पाणी जरी गूढ

“पाहे पा नाव देखता बरवी । कोणी आड घाली काय अथावी ।
का सुपंथ जाणोनिया अडवी । रिगवत असे ॥ २४०/८”

माणसासमोर नेहमी जगण्याचे दोन मार्ग असतात. एका मार्गाने ब्रह्मत्वास जाता येते. दुसऱ्या मार्गाने संसारचक्रात अडकावे लागते... हे मार्ग समजावून सांगताना ही उपमा दिलेली आहे-

समोर चांगली नाव दिसत असता कोणी अथांग पाण्यात उडी घेईल का? किंवा राजमार्ग माहीत असताना कोणी आडवाटेला जाईल का?

***

दिव्यावर दिवा। दुसरा लावला
कोणता पहिला। कोणा कळे?

१५ दिव्यावर दिवा

१) दीपु ठेविला परिवरीं। कवणातें नियमी ना निवारी।
आणि कवण कवणिये व्यापारीं। राहाटे तेंहि नेणे॥ १२८/९

प्रकृतीचा खेळ चालू असतो. 'मी'(कृष्ण, ईश्वर) त्या सर्वाचा आधार आहे पण 'मी' काही करत नाही. जसा घरात लावलेला दिवा कुणाला काय कर, करू नको ते सांगत नाही. कोण काय करतं आहे हेही तो जाणत नाही. पण तो असतो म्हणून सर्व व्यापार घडतात..

२) जैसा दीपे दीपु लाविजे। तेथ आदिल कोण हे नोळखिजे।
तैसा सर्वस्वे जो मज भजे। तो मी होऊनि ठाके॥ ४२८/९

भक्त माझी भक्ती करता करता मीच होऊन जातो. मग भक्त कोण आणि ईश्वर कोण हे ओळखताच येत नाही. जसा दिव्याने दिवा लावला तर हा पहिला आणि हा दुसरा असा भेद राहात नाही. दोन्ही दिवे सारखेच असतात..

३) कां स्नेहसूत्रवन्ही। मेळू एके स्थानी।
धरिजे तो जनीं। दीपु होय॥ १५४/१३

तूप, वात आणि अग्नी एकत्र येऊन दिवा बनतो तशी अहंकार, बुद्धी, मन, पाच ज्ञानेंद्रिये पाच कर्मेंद्रिये, इच्छा, व्देष, सुख, दुःख, चेतना... इत्यादी छत्तीस तत्त्वे एकत्र येऊन शरीर (ज्ञानेश्वरीत क्षेत्र असं म्हटलं आहे) बनते..

विश्वपसाऱ्याची । जेवढी की व्याप्ती
तेवढी प्रतिती । ईश्वराची..!

१६ विश्वपसारा

“ ‘आगा हे जेव्हडी माझी व्याप्ती । तेव्हडीचि तयाचि प्रतिति ।
ऐसे बहुधाकारी वर्तती । बहुचि होउनि ॥
हे भानुबिंब आवडेतया । सन्मुख जैसे धनंजया ।
तैसे ते विश्वा या । समोर सदा ॥ २५८,२५९/९ ”

माझी जेवढी व्याप्ती तेवढी ते सर्व मीच ही प्रचिती येते.
म्हणून ज्ञानी लोक अनेक होऊन मला एकाला जाणतात.
सूर्यबिंब जसे प्रत्येकाच्या समोर असते त्याप्रमाणे ते नेहमी
विश्वाच्या समोर असतात.

***

विस्तार वडाचा । वसे बीजामध्ये
आणि वडामध्ये । वसे बीज..!

१७ विस्तार वडाचा

“सविस्तर वटत्व जैसे । बीजकणिकेमाजी असे ।
आणि बीजकणु वसे । वटी जेवी ॥
तेवीं आम्हां तया परस्परें । बाहेरी नामाचींचि अंतरे ।
वांचूनि आंतुवट वस्तु-विचारें । मी तेचि ते ॥ ४१०, ४११/९”

भक्त आणि ईश्वर यांच्यातलं नातं समजावून सांगताना दिलेली उपमा- संपूर्ण वटवृक्षाचा विस्तार त्याच्या बीजामध्ये असतो आणि वटवृक्षामध्ये बीज वसलेले असते तसे आम्ही परस्परांमध्ये सामावलेले असतो. बाहेर दिसणारे अंतर केवळ नामाचे असते.

***

गंध जाई दूर । फूल उरे मागे
देठामधे जागे । आत्मभान..!

१८ गंध जाई दूर

“ परिमळु निघालिया पवनापाठी । मागे वोस फुल राहे देठी ।
तैसे आयुष्याचिये मुठी । केवळ देह ॥

येर अवष्टंभु जो आघवा । तो आरूढोनि मद्भावा ।
मजचि आंतु पांडवा । पैठा जाहला ॥ ४१३, ४१४/९”

गंध वाऱ्यावर दूर निघून गेला तरी देठाची पकड असेपर्यंत फूल देठावर राहाते. तसे आत्मज्ञान झाल्यावर जगण्यासारखे काही उरलेले नसताना भक्ताचे आयुष्य त्याचा देह धरून ठेवते..! एरव्ही त्याचा देहाहंकार ईशरूपात केव्हाच स्थित झालेला असतो.

***



कमळ फुलता । गंध ओसंडला
लपविता आला । नाही त्याला..!

१९ कमळ फुलता

“ जैसी कमळकळिका जालेपणे । हृदयीचिया मकरंदाते राखो नेणे ।
दे राया रंका पारणे । आमोदाचे ॥
तैसेनि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषें कथूं विसरत ।
मग तया विसरामाजीं विरत । आंगे जीवें ॥ १२७, १२८/१० ”

पूर्ण उमललेले कमळ आपला गंध लपवून ठेवू शकत नाही. राजा रंक साऱ्यांना त्याचा आनंद मिळतो. त्याप्रमाणे माझ्या भक्ताला भक्तीचा आनंद लपवता येत नाही.. माझे वर्णन करण्याच्या आनंदात त्याला सगळ्याचा विसर पडतो...

***

वर खाली आत। सर्वत्र बाहेर
नभ घरदार। मेघांसाठी..!

२० वर खाली आत

“जैसे मेघां या तळीं वरी। एक आकाशचि आंत बाहेरी।
आणि आकाशींचि जाले अवधारी। असणेंही आकाशी॥
पाठी लया जे वेळी जाती। ते वेळी आकाशींचि होऊनि ठाती।
तेवी आदि स्थिती अंतगती। भूतांसि मी॥ २१७,२१८/१०”

ईश्वराचे व्यापकत्व विभूतीयोगाने समजावून सांगताना दिलेली उपमा-

ढगांच्या खाली-वरती, आत-बाहेर आकाश असतं. ते तिथंच उत्पन्न होतात, तिथेच राहतात आणि लय पावतात तेव्हा आकाशच होऊन जातात. त्याप्रमाणे सर्व प्राण्यांच्या उत्पत्ती स्थिती लयाला मीच आश्रय आहे.

***

अमृताचा घनु । प्रत्यक्ष ‘सावळा’
पार्थ आसुसला । पावसाळा..!

२१ अमृताचा घनु

“ तो कृपापीयूष सजळु । आणि येरु जवळा आला वर्षाकाळु ।
नाना कृष्ण कोकिळु । अर्जुन वसंतु ॥११३/११”

कृष्ण म्हणजे कृपेच्या अमृताचा मेघ आणि अर्जुन म्हणजे जवळ आलेला वर्षाकाल, तो कोकिळ आणि अर्जुन वसंत.. असं दोघातलं नातं होतं..! त्याचं वर्णन करताना दिलेली उपमा....

***



दुःखकालिंदीच्या । अतळ डोहात
नित्य बुडतात । कैक गाथा..!

२२ दुःखकालिंदी

“ हे बापडी लोकसृष्टी । मोटकीये विपाइली दिठी ।
आणि दुःखकालिंदीचा तटी । झाड होऊन ठेली ॥ ३४७/११”

विश्वरूप-दर्शन घडवताना चाललेला स्वरूप विस्तार पाहताना अर्जुनाला काय वाटलं त्याचं वर्णन करताना दिलेली उपमा- विश्वरूप-दर्शनाचा सोहळा चाललेला असताना दुःखकालिंदीच्या किनाऱ्यावर संपूर्ण लोकसृष्टी झाड होऊन निश्चल उभी राहिलीय.. असं दिसलं..

***



विश्वरूप तुझे । आवर आवर
पाहाया अधीर । कृष्णरूप..!

२३ विश्वरूप तुझे

“यालागी जी देवा । एथिंचे भय उपजतसे जीवा ।
म्हणोनि येतुला लळा पाळावा । जे पुरे हे आता ॥
पै चराचर विनोदे पाहिजे । मग तेणे सुखे घरी राहिजे ।
तैसे चतुर्भुज रूप तुझे । तो विसावा आम्हा ॥ ५९३, ५९४/११”

विश्वरूप दर्शनाने भांबावलेला अर्जुन कृष्णाला म्हणतो आहे, तुझे विराट रूप पाहून मी भ्यालो आहे.. आता माझं ऐक आणि तुझा हा स्वरूप-विस्तार थांबव. तुझे नेहमीचे साधे रूप हाच आम्हाला विसावा आहे.

***

घरट्यात जीव । ठेवून पक्षिण
आकाशी भ्रमण । करतसे..!

२४ घरट्यात जीव

“ हें रूप जरी घोर । विकृति आणी थोर ।
तरी कृतनिश्चयाचें घर । हेंचि करी ॥ ६३२/११

का अजातपक्षिया जवळा । जीव बैसवूनि अविसाळा ।
पक्षिणी अंतराळा- । माजी जाय ॥ ६३४/११”

घाबरलेल्या अर्जुनाला विश्वरूपाचं महत्त्व समजावून सांगताना दिलेली उपमा-

पंख न फुटलेल्या पिलाजवळ जीव ठेवून पक्षिण आकाशात झेपावते तसा तू आपला जीव माझ्या विश्वरूपाजवळ ठेव आणि मग माझ्या मानवी रूपावर प्रेम कर. कारण विश्वरूप हेच माझे खरे रूप आहे-

माळी नेतो तसे । सुखे जाते पाणी
पेरणी रुजणी । माळी जाणे..!

२५ माळी नेतो तसे

“ करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे ।
विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ॥ ११८/१२

माळिये जेउतें नेले । तेउते निवांतचि गेले ।
तया पाणिया ऐसे केलें । होआवें गा ॥ १२०/१२ ”

ईश्वरप्राप्ती कशी करून घ्यावी याचे वेगवेगळे मार्ग समजावताना दिलेली उपमा-

माळी नेतो तसे विनातक्रार जाते पाणी.. त्याने काही केले असे होते का? तसे आपले जीवित अहंकार विरहित होऊन कर्म करणारे व्हावे. कारण ज्याच्या सत्तेने हे विश्व चालले आहे तो परमात्माच काय करायचं काय नाही हे जाणत असतो...

***

आभासी नीलिमा । दिसे आकाशात
तसे शरीरात । वसे मन..!

२६ आभासी नीलिमा

‘जे इंद्रिया आणि बुद्धी । माझारिलिये संधी ।
रजोगुणाचा खांदी । तरळत असे ॥

नीळिमा अंबरी । का मृगतृष्णा लहरी ।
तैसे वायांचि फरारी । वावो जाहले ॥ १०४, १०५/१३

क्षेत्राविषयी म्हणजे शरीराविषयी विस्ताराने सांगताना मनाच्या स्वरूपाचे वर्णन आले आहे-

इंद्रिये आणि बुद्धी यांच्या मध्यसंधीमधे रजोगुणाच्या खांद्यावर मन तरळत असते. आकाशाचा नीलिमा किंवा मृगजळाच्या लाटांप्रमाणे ते आभासी असते.

***



मुळांना खालती । सापडले पाणी
सांगे आबादानी । वरतून..!

२७ मुळांना खालती

“ अगा वृक्षासि पाताळी । जळ सापडे मुळीं ।
ते शाखांचिये बाहाळीं । बाहेर दिसे ॥ १७९/१३
तैसे हृदयीचेनि ज्ञानें । जियें देहीं उमटती चिन्हें ।
तियें सांगो आतां अवधानें । चांगे आइक ॥ १८३/१३”

वृक्षाच्या मुळांना खाली पाणी सापडते ते आपल्याला दिसत नाही पण वरच्या फांद्यांच्या विस्तारावरून ते समजते. तसे ज्ञान ही डोळ्यांना दिसणारी गोष्ट नाही. पण ते प्राप्त झाले असता ज्ञानी माणसाच्या जगण्यात उतरते आणि ते त्याच्या वागण्यातून डोकावत राहते तेव्हा डोळ्यांनाही दिसू लागते. कसे ते पुढे सांगितले आहे.

***

गाभ्यात पोकळ । फळून भरते
मग उन्मळते । केळीबाई..!

२८ गाभ्यात पोकळ

“ केळींचे दळवाडें । हळू पोकळ आवडे ।
परि फळोनिया गाढें । रसाळ जैसे ॥ २१२/१३ ”

ज्ञानी माणसाचे मन इतके तरल होते की त्याला आपल्या असण्याचाही संकोच वाटतो. त्याच्यातील ‘अदंभ’भावाविषयी सांगताना दिलेल्या उपमा-

केळीचा गाभा हलका आणि पोकळ असतो तरी ती फळते आणि रसाने भरून जाते.. ज्ञानी माणूस ज्ञानरसाने भरलेला असूनही पोकळ, हलका राहातो..

***

नभ मेघांतळी । पथ पायांतळी
तरू स्थीर मुळीं । ज्ञानी जसा..!

२९ नभ मेघांतळी

“जातया अभ्रासवे । जैसे आकाश न धावे ।
भ्रमणचक्री न भंवे । ध्रुव जैसा ॥ ४८८/१३
पांथिकाचिया येरझारा । सवें पंथु न वचे धनुर्धरा ।
कां नाही जेवी तरुवरा । येणे जाणे ॥४८९/१३
तैशा आल्या गेल्या ऊर्मी । नव्हे गजबज मनोधर्मी ।
किंबहुना धिरु क्षमी । कल्पांतीही ॥४९८ /१३”

गुरूकृपेविषयी विस्तारानं सांगून झाल्यावर ज्ञानी माणसाच्या स्थिरतेविषयी, धैर्याविषयी सांगितले आहे. ते सांगताना दिलेल्या उपमा- ढगांबरोबर आकाश धावत नाही, ग्रह-ताऱ्यांच्या भ्रमणचक्रात ध्रुवतारा फिरत नाही, पथिक जात येत असतात पण पायांखालचा रस्ता स्थिर असतो, बाजूचे वृक्ष स्थिर असतात.. तसा ज्ञानी इंद्रियांच्या ऊर्मींच्या गजबजाटातही स्थिरचित्त असतो.

***

गळणे फुलणे। नित्य चालतसे
वृक्ष साहतसे। जन्मदुःख..!

३० गळणे फुलणे..

“ डोळा हरळ न विरे। घायी कोत न जिरे।
तैसे काळीचे न विसरे। जन्मदुःख ॥ ५३८/१३”

ज्ञानी माणसातील अहंभाव- ‘मी आहे’ याची जाणीव नाहिशी होते. त्याला असण्याचा, देहाकारात असण्याचा तिटकारा वाटू लागतो. गतजन्मांच्या विदारक स्मृतींनी पुन्हा जन्माला आल्याचे दुःख होते.. हे सांगताना परोपरीच्या, अंगावर येतील अशा उपमा दिलेल्या आहेत.. त्यातली एक सुसह्य उपमा--

डोळ्यात खडा किंवा जखमेत काटा खुपत राहातो तसे ज्ञानी माणसाला जन्मदुःख सलत राहाते..

***

आरशात बिंब । दिसे, परी नसे
देहामध्ये तसे । आत्मतत्त्व..!

३१ आरशात बिंब

“ आरिसा मुख जैसे । बिंबलिया नाम असे ।
देहीं बसणे तैसे । आत्मतत्त्वा ॥ १०९६/१३

एवंरूप पै आत्मा । देहीं जें म्हणती प्रियोत्तमा ।
ते मठाकारे व्योमा । नाम जैसें ॥ १११४/१३ ”

देह आणि आत्मा यांचं अदृश्य नातं परोपरीनं समजावताना दिलेली उपमा-

आरशात चेहरा आहे असं म्हणता येत नाही. त्याला प्रतिबिंब म्हणतात. देहातील आत्म्याचं असणं आरशातील या प्रतिबिंबासारखं आहे. असा आत्मा देहात आहे असं म्हणणं म्हणजे मठाच्या आकारातील आकाशाला मठाकाश म्हणण्यासारखं आहे.

***

घट फुटे तेव्हा । मुक्त घटाकाश
आकाशी आकाश । मिळतसे..!

३२ घट फुटे तेव्हा..

मी जैसा अनंतानंदु । जैसाचि सत्यसिंधु ।
तैसेचि ते भेदु । उरेचि ना ॥ ५३,
जें मी जेवढे जैसे । तेंचि ते जाले तैसे ।
घटभंगी घटाकाशें । आकाश जेवीं ॥ ५४/१४
घटाचिया खापरिया । घटभंगी फेडिलिया ।
महदाकाश आपैसया । जालेंचि असे ॥ ३१६/१४

स्वरूपज्ञान झालेल्या व्यक्तीला मद्रूपता (ईशरूपता) प्राप्त झालेली असते. या ऐक्याचे स्वरूप समजावताना दिलेली उपमा- मी अमर्याद आनंद, सत्याचा समुद्र आहे तसेच ज्ञानीजन असतात. आमच्यात काही भेद नाही. घट फुटल्यावर घटाकाश जसे महाकाश होते तसे, ज्ञानप्राप्तीमुळे आपला वेगळेपणा जे विसरून गेले ते मी जसा जेवढा तसेच झालेले असतात.

***

अनेकधा झाले । प्रतिबिंब जळी
वरून न्याहाळी । कल्लोळांना..!

३३ अनेकधा झाले..

“ नातरी आपण जळी । बिंबलो तिरोनी न्याहाळी ।
चळण होता कल्लोळी । अनेकधा ॥ २८९/१४
तैसे गुणीं गुणापरौतें । जें आपणपें असे आयितें ।
तिये अहं बैसे अहंते । मूळकेचिये ॥ २९२/१४
तैं तेथुनि मग पाहता । म्हणे साक्षी मी अकर्ता ।
हे गुणचि क्रियाजातां । नियोजना ॥ २९३/१४”

त्रिगुणांच्या आधीन असलेला देह त्यांच्या प्रेरणांनुसार वर्तन करत असतो. ज्यावेळी ‘पुरुष’ द्रष्टा होऊन हे पाहतो तेव्हा तो गुणातीत स्व-रूप जाणू शकतो.. हे सांगताना दिलेली उपमा-

काठावरून पाहिले असता आपले प्रतिबिंब तरंगांमुळे विस्कटून गेलेले दिसते पण काठावरून अलिप्तपणे पाहिले असता बिंब आपल्या जागी स्थिर आहे हे लक्षात येते तसे त्रिगुणांमुळे स्व-रूप अनेकविध रूपात वर्तताना दिसत असले तरी ज्ञानी माणसाला सत् रूप स्थिर असते हे कळलेले असते.

***

ऐल ओलांडुनी । क्षितिजी पोचला
ऐल पैल झाला । एकाकार..!

३४ ऐल ओलांडुनी

“ जैसा सैंधवाचा रवा । सिंधूमाजीं पडावा ।
विरालेया विरवावा । हेंही ठाके ॥ ३९३/१४
नातरी जाळूनि तृण । वन्हिही विझे आपण ।
तैसे भेदु नाशूनि जाण । ज्ञान नुरे ॥ ३९४/१४
माझे पैलपण जाये । भक्त हे ऐलपण ठाये ।
अनादि ऐक्य जे आहे । तेंचि निवडे ॥ ३९५/१४”

एका ईश्वराखेरीज कोणताही विचार नाही अशी अव्यभिचारी उपासना करणारा भक्त त्रिगुणातीत अशा ब्रम्हत्वाशी पोचतो... हे समजावताना दिलेल्या उपमा-

मीठ समुद्राच्या पाण्यात पडले तर ते असे एकरूप होते की मीठ तर वेगळे राहातच नाही पण ते विरघळले हेही उरत नाही. गवत जाळून मग अग्नीही विझतो तसे वेगळेपण नाहीसे करून ज्ञानही त्या ऐक्यात विलीन होते तेव्हा भक्त आणि ईश्वर यांच्यातील ऐल-पैलपण विरून सर्व एकाकार होते..!.

***



अवस्थात्रयाने । रूजतो वरती
विस्तारे खालती । विश्वाकार

३५ अवस्थात्रयाने...

“ते ऊर्ध्व आत्मा निर्मळे । अधोर्ध्व सूचित मूळें ।
बळिया बांधोनि आळें । मायायोगाचे ॥
मग आधिली सदेहांतरे । उठती जिये अपारे ।
तें चौपासि घेऊनि आगारे । खोलावती ॥
ऐसे भवद्रुमाचें मूळ । हें ऊर्ध्वीं करी बळ ।
मग आणियांचें बेंचळ । अधीं दावी ॥ ९१,९२,९३/१५”

विश्व-संसाराला अश्वत्थ वृक्षाची उपमा देऊन त्याची निर्मिती आणि विस्तार कसा होतो याचे सविस्तर वर्णन केले आहे.. ब्रह्मतत्त्व आणि माया यांच्या दृढ संबंधांचे आळे तयार होऊन त्यात या वृक्षाची निर्मिती होते. असंख्य देहरूपी अंकूर फुटून त्याचा अपार विस्तार होतो. अशा या संसारवृक्षाचे मूळ (माया) ते वरच्या बाजूस म्हणजे ब्रह्माच्या ठिकाणी रुजले की फांद्यांचा विस्तार सतत वाढत राहातो....

***

३६ मेघ उपसती..



मेघ उपसती । समुद्राचे पाणी
नद्यांची भरणी । चालू राहे..!

“ जैसा मेघांचेनि तोंडें । सिंधु एकें अंगें काढे ।
आणि नदी येरीकडे । भरितीचि असती ॥ ११९/१५
तेथ वोहटे ना चढे । ऐसा परिपूर्णुचि आवडे ।
परी ते फुली जंव नुघडे । मेघानदींची ॥ १२०/१५
ऐसे या रुखाचें होणें जाणें । न तर्के होतेनि वहिलेपणें ।
म्हणौनि लोक् यातें म्हणे । अव्यय् हा ॥ १२१/१५”

खाली फांद्या आणि वर मुळे अशा विश्वरूपातील मायावी संसारवृक्षाचे स्वरूप समजावताना दिलेल्या उपमा-

एकीकडून मेघ समुद्र उपसत राहतात तर दुसरीकडून नद्या भर घालत राहतात... त्यामुळे समुद्र कधी आटलाय किंवा ओसंडून वाहतोयसं दिसत नाही. सदैव पूर्ण भरलेला दिसतो. (पण ही स्थिती मेघ आणि नद्यांचे कार्य सुरळीत असते तोपर्यंतच...) त्याप्रमाणे पानगळ आणि बहर यांच्या आवर्तनांमुळे संसारवृक्ष अविनाशी आहे असे वाटते.

***

३७ निषिद्ध कर्माचे..

“ प्रतिपादिती अभिचार । आगम जे परमार ।
तेही पानीं घेती प्रसर । वासना वेली ॥

तंव तंव होती थोराडें । अकर्माचीं तळबुडें ।
आणि जन्मशाखा पुढें पुढें । घेती धाव ॥ १६७, ६८ / १५”

निषिद्ध कर्माचे । मूळ जसे वाढे
धावे पुढे पुढे । जन्मशाखा..!

संसाररूपी वृक्षाचं, त्याच्या विस्ताराचं वर्णन करताना दिलेली उपमा- जारणमारणादि निषिद्ध कर्मरूपातली मुळं मोठी होतील तसतशी वासनावेल विस्तारत जाते. त्यातून जन्मशाखा पुढे पुढे धाव घेत राहतात..

***

सूर्यरश्मी जशा भेदती मेघांस
ओलांडे देहास ज्ञानी तसा..!

३८ सूर्यरश्मी जशा..

“ज्ञानें कां जयांचे डोळे । देखोनि न राहाती देहींचे खोळे ।
सूर्यरश्मी आणियाळे । ग्रीष्मीं जैसे ॥ ३८२ /१५
तैसी विवेकाचेनि पैसें । जयांची स्फूर्ती स्वरूपी बैसे ।
ते ज्ञानिये देखती ऐसें । आत्मयातें ॥ ३८३ / १५”

ज्ञानचक्षू लाभलेले योगी नित्य आत्मभावात असतात हे सांगताना दिलेली उपमा-

ग्रीष्म ऋतूत सूर्याची किरणे जशी मेघांचा अडसर दूर करून प्रकाशतात तसे ज्ञानी लोक देहाचा मधला अडसर बाजूला करून नित्य आत्मस्वरूपच पाहतात.

***

शाखा असे खूण । कोर दाखवाया
तशा उपाधी या । खुणा त्याच्या

३९ शाखा असे खूण..

“ पै सांगण्याजोगे नव्हे । तेथींचे सांगणे ऐसें आहे ।
म्हणौनि उपाधि लक्ष्मीनाहें । बोलिजे आदीं ॥
पाडिव्याची चंद्ररेखा । निरुती दावावया शाखा ।
दाविजे तेवीं औपाधिका । बोली इया ॥ ४६९, ४७०/ १५”

कृष्णार्जुन संवादात अर्जुन कृष्णाला त्याच्या निरुपाधिक (ज्ञानेंद्रियांनी जाणता येईल अशी कोणतीही मिती नसलेल्या) शुद्ध रूपाविषयी प्रश्न करतो. तेव्हा कोणतीही उपाधी नसणं ही अवस्था समजून घेण्यासाठी उपाधींचा आधार कसा घ्यावा लागतो हे सांगताना दिलेली उपमा.

ते शुद्ध रूप शब्दांत वर्णन करून सांगण्याजोगे नाही. म्हणून ते काय नाही किंवा कशाने झाकले आहे असे उपाधींच्या, सगुणाच्या आधाराने सांगावे लागते. प्रतिपदेची बारीक चंद्रकोर वृक्षाच्या फांदीच्या आधाराने दाखवावी लागते त्याप्रमाणे माझे निरुपाधिक शुद्ध रूप अशा सगूण उपाधींच्या आधाराने समजून घ्यावे लागते.

***

देह अंहतेचे । घरकुल सोडे
चिदाकाशी उडे । जीवपक्षी..!

४० देह अहंतेचे..

“जेणे विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ॥ २/१६”

सोळाव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच ही उपमा आलेली आहे. नेहमीचा सूर्योदय विश्व उजेडात आणतो. एका अर्थी तो द्वैताचे दर्शन घडवतो. पण मायेच्या, अज्ञानाच्या रात्रीचा नाश करून आत्मज्ञानाचा सूर्य उगवला की अध्यात्मज्ञानाचा दिवस उगवतो. अशा प्रातःकाळी आत्मज्ञानाची दृष्टी प्राप्त होऊन जीवपक्षी ‘मी म्हणजे देह’ या समजुतीचे घरटे सोडून देतात..

***

निराकार जरी । विश्वरूप घेई
परमाणू होई । गगन हे..!

४१ निराकार जरी..

“ परी महाभूतें पोटीं वाहे । तेवींचि परमाणूमाजीं समाये ।
या विश्वानुसार होये । गगन जैसे ॥
काय सांगों ऐसें जिणें । जें जगाचेनि जीवें प्राणें ।
तया नांव म्हणें । मार्दव मी ॥ १७३ १७४ / १६”

दैवी संपत्ती असलेले गुण कोणते याचे वर्णन चालले आहे. त्यात मार्दव या गुणाचे स्वरूप समजावून सांगतांना दिलेली उपमा.

आकाश असीम आहे. पण ते पंचमहाभूते पोटात धारण करते, तसे परमाणूरूपातही सामावते. ‘स्व’ मधे न आणता जसे विश्व आहे तसे ते होते. त्याप्रमाणे ‘स्व’ बाजूला ठेवून जीवमात्रांसाठी जगत राहणे या गुणाला मी मार्दव म्हणतो..

***

आकाश वर्षते । डबकी बिंबते
तदाकार होते । असीम जे..!

४२ आकाश वर्षते..

“ आणि कर्ता ते दुजें । कर्माचें कारण जाणिजे ।
प्रतिबिंब म्हणिजे । चैतन्याचें जें ॥ ३२१/१८
‘आकाशचि वर्षे नीर । तें तळवटीं बांधे नाडर ।
मग बिंबोनि तदाकार । होय जेवीं ॥ ३२२/१८’
तैसें आपुलेनि विसरें । चैतन्यचि देहाकारें ।
आभासोनी आविष्कारे । देहपणें जें ॥ ३२४/१८
जया विचाराचां देशीं । प्रसिद्धी गा जीवु ऐसी ।
जेणें भाक केली देहेंसीं । आघवाविषयी ॥ ३२५/१८”

कर्मं अखंड घडत असतात. कृष्ण त्यांची कारणं अर्जुनाला समजावून सांगत आहे. पहिलं कारण देह. दुसरं जीव. जीवाचं स्वरूप समजून देताना ही उपमा दिलेली आहे. आकाश पर्जन्याचा वर्षाव करतं. त्याचं पृथ्वीवर डबकं तयार होतं. आणि असीम असलेलं आकाश डबक्याच्या आकाराचं होतं. तसे चैतन्य देहाकार धारण करून कर्मरूपात व्यक्त होत राहातं. आणि ‘स्व’रूपाचा विसर पडून ‘मी देह आहे’ असं मानू लागतं. अशी विपरित समजूत करून घेतलेले चैतन्य म्हणजे जीव. या जीवाने अवघी कर्मे करण्याबाबत देहाशी करार केलेला आहे..

***

वारा जाई दूर । झाड ओलांडून
डोलणे ठेवून । फांद्यांवर..!

४३ वारा जाई दूर..

“ऐसोनि अहंकृतिभावो । जयाचा बोधी जाहला वावो ।
तऱ्ही देहा जंव निर्वाहो । तंव आथी कर्में ॥
आगा वारा जरा वाजोनि वोसरे । तरी तो डोल रुखी उरे ।
कां सेंदे दृति राहे कापुरें । वेंचलेनी ॥ ४२२, २३ / १८”

मी कर्मांचा कर्ता आहे असा अहंकार ज्याला नाही, जो यापासून अलिप्त आहे त्याचं स्वरूप समजावताना ही उपमा दिलेली आहे.

जसा वारा झाड पार करून दूर निघून गेला तरी त्यामुळे झाडाच्या फांद्यांमधे निर्माण झालेला कंप, त्यामुळे त्यांचे डोलणे काही काळ मागे राहते किंवा डबीमधे ठेवलेला कापूर संपला तरी त्याचा गंध काही काळ डबीत रेंगाळत राहतो तसे स्वरूप ज्ञान झालेली व्यक्ती कर्म-प्रक्रियेपासून अलिप्त झाली तरी देह आहे तोपर्यंत त्याच्या असण्यामुळे कर्मे होतच राहतात..!

***

गर्जनेशिवाय। वर्षाकाली धुंद
वर्षे मेघवृंद। सात्विकसा..!

४४ गर्जनेशिवाय..

“ परि फलशून्यता। नाहीं तया विफळता।
पैं फळासीचि पांडुसुता। फळें कायसी॥
आणि आदरे करी बहुवसें। परी कर्ता मी हे नुमसे।
वर्षाकाळीचे जैसें। मेघवृंद॥ ६३३, ३४/१८”

कर्मे करणारा सात्विक कर्ता कसा असतो ते सांगताना दिलेली उपमा-

नित्यनैमित्तिक कर्मे ही स्वतःच फलस्वरूप असतात. त्यामुळे ती निष्फळ होण्याचा प्रश्नच नाही. फळांनाच फळं असणं, नसणं हे कसं शक्य होईल? वर्षाकालातील मेघवृंद गर्जना न करता बरसत असतात तसा सात्विक कर्ता गाजावाजा न करता कर्तव्यबुद्धीने नित्यनैमित्तिक कर्मे करत असतो. मी कर्ता हेही तो जाणत नाही..!

***



संकल्प-विकल्प । फेडले लुगडे
निःशंक उघडे । केले मन..!
सात्विक ते धैर्य । आतून उगवे
बुद्धी-चंद्रामागे । उगी राही..!

४५ सात्विक ते धैर्य..

“ अधोर्ध्व गुढें काढी । प्राण नावाची पेंडी ।
बांधोनी घाली उडी । मध्यमेमाजी ॥
संकल्प-विकल्पांचें लुगडे । सांडूनि मन उघडें ।
बुद्धीही मागिलेकडे । उगीचि बैसे ॥ ७३९, ४० / १८”

जे जे आहे ते सर्व त्रिगुणात्मक आहे. याचे तपशीलवार वर्णन करताना सात्विक धैर्यासंदर्भात ही उपमा दिलेली आहे.

जे धैर्य प्राण..अपान.. आदि नऊ वायुंची जुडी करून नंतर सुषुम्नेमधे उडी घेते, संकल्प-विकल्पांचें वस्त्र उतरवून मन उघडे करते आणि बुद्धीच्या मागे जाऊन निवांत बसते.. असे धैर्य ते सात्विक धैर्य..!

***

मुक्काम दिसता । चालणे सरते
वाट ही नुरते । पायांखाली..!

४६ मुक्काम दिसता

“नाना चालीचिया वाढी। वाट होत जाय थोडी।
मग पातला ठायीं बुडी। देऊनि निमे।। ११०२/१८”

गाव जवळ आले की वाट थोडी उरते आणि पोचल्यावर बुडून नाहीशी होते.

अद्वैत ज्ञान होऊ लागते तशी द्वैताची वाट संपत जाते आणि पूर्ण ज्ञान झाले की नाहीशी होते... हे समजावताना ही उपमा दिलेली आहे.

***

आसावरी काकडे यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके

कव्हरवर एकच क्लिक आणि पुस्तक उघडेल





ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष

आसावरी काकडे यांचे ईसाहित्यवरचे हे चौथे पुस्तक.

आसावरी काकडे हे नाव माहित नाही असा कोणी मराठी वाचक नसेल. इयत्ता सातवी ते MA अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा अभ्यास करून नवीन पिढी मोठी होत आहे. आधीच्या पिढीनेही अनेक पुस्तकांतून आणि कार्यक्रमांतून त्यांच्या काव्याचा आस्वाद आणि विचारांचा परिचय घेतला आहे. त्यांच्या पुस्तकांना मानधनासहित प्रकाशित करण्यासाठी प्रकाशकांची अहमहमिका असते. परंतू त्यांनी या पुस्तकांसाठी ई साहित्यचा मार्ग अनुसरला व वाचकांना विनामूल्य वाचनानंद द्यायचा निर्णय घेतला. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता त्यांनी उदार हस्ते ही पुस्तके आमच्या लाखो वाचकांना दिली.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि.

देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी, किशोर कुलकर्णी, रामदास खरे, अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।


अनुपम्य सृष्टी | खेळ निर्मात्याचा
जणू आनंदाचा |अनुकार..!